ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख २४ सप्टेंबर, १९५८ | अंक ३९

## विविध माहिती

**भारत-चीन व्यापार**—गेल्या वर्षीच्या भारत व चीन ह्यांच्यामधील व्यापारांत भारताच्या बाजूनें १,१७,००,००० रुपयांची प्रतिकूल तफावत दिसून आली. भारताकडून निर्यात करण्यांत आलेल्या मालाची किंमत ३,६८,००,००० रुपये झाली तर भारतानें आयात केलेल्या मालाची किंमत ४,८६,००,००० रुपये झ ली. भारतानें केलेल्या आयातींत रासायनिक द्रव्यांचा अनुक्रम पहिला लागतो.

**ब्रिटन-न्यूयॉर्क विमान वहातूक**—पॅन-अमेरिकन विमान-वहातूक कंपनीनें ‘ बोइंग ७०७ ’ ह्या प्रचंड विमानाच्या साह्यानें ब्रिटन त न्यूयॉर्क प्रवासी विमानवहातूक लवकरच सुरू करण्याचें ठरविलें आहे. ह्या प्रवासाचें चांचणीचें उड्डाण नुकतेंच करण्यांत आलें. अटलांटिक सागर ओलांडण्याला विमानाला ७ तास, २९ मिनिटें वेळ लागला.

**‘ गीताप्रवचना ’चा विलक्षण खप**—आचार्य विनोबा भावे ह्यांनीं १९३२ मध्यें धुळें येथील तुरुंगांत असतांना गीतेवर दिलेलीं व्याख्यानें पुढें पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत आलीं. ह्या पुस्तकाच्या ७,४८,००० प्रती खपल्या आहेत. भारतामधील पुस्तकाच्या खपाचा हा उच्चांक आहे. मूळ मराठींत असलेल्या ह्या पुस्तकाचीं १७ भारतीय भाषांत भाषांतरें झालीं आहेत.

**ताशीं २,००० मैलानें प्रवास**—येत्या दहा वर्षांच्या कालांत दर तासाला २,००० मैल वेगानें प्रवास करणारीं विमानें रोजच्या व्यवहारांत येऊं शकतील, अशी माहिती पॅन-अमेरिकन एअरवेज कंपनीच्या उपाध्यक्षांनीं सांगितली. अशा विमानासाठी नवे विमानतळ बांधावे लागणार नाहींत असेंहि ते म्हणाले.

**हिंदमधील कागदाच्या गिरण्या**—१९५५ सालीं हिंद-मधील कागदाच्या गिरण्यांनीं राष्ट्रीय संपत्तींत १०,७४,००,००० रुपयांची भर घातली. १९५४ सालीं ८,०२,००,००० रुपयांची भर त्यांनीं घातली होती. भारतांत कागदाच्या एकूण ५० गिरण्या आहेत. त्यांपैकी पश्चिम बंगाल व मुंबई राज्यांत प्रत्येकी १६ आहेत. उत्तर प्रदेशांत ७ आहेत आणि ११ इतर राज्यांत पसरलेल्या आहेत.

**पंजाबमधील गव्हाची सांठेबाजी**—पंजाब सरकारनें गेल्या कांहीं दिवसांत निरनिराळ्या गांवांत मिळून २ लाख मण गव्हाचा सांठा आपल्या ताब्यांत घेतला आहे. सांठे ताब्यांत घेऊन गव्हाच्या किंमती खालीं आणण्याच्या सरकारच्या धोरणास अनुसरून सरकारनें आतांपर्यंत ५ लाख मण गहूं ताब्यांत घेतला आहे. सरकारच्या धोरणामुळें गव्हाच्या किंमती मणामागें दोन रुपयांनीं घसरल्या आहेत.

**मोटारींचीं एंजिनें तयार करण्याचा कारखाना**—जमशेटपूर येथें मोटारींना लागणारीं डिझेल एंजिनें तयार करण्याचा कारखाना काढण्याचें टाटा एंजिनीअरिंग कारखान्याच्या चालकांनीं ठरविलें आहे. ऑक्टोबर १९५९ पासून प्रत्यक्ष उत्पा-दनास प्रारंभ होईल. दरसाल ६ ते ७ हजार एंजिनें तयार करण्यांत येतील, असा अंदाज आहे. त्यामुळें दरसाल ८ ते ९ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होईल.

**रुमेनिआची भारताला देणगी**—दिल्लीपासून १८ मैलांवर असलेल्या एका खेड्याला रुमेनिआच्या सरकारनें एक यंत्रचलित नांगर आणि शेतीचीं अवजारें भेटीदाखल दिलीं आहेत. रुमे-निआचे मुख्य मंत्री मि. स्टोइका भारतांत आले होते, त्यावेळीं त्यांनीं ह्या खेड्याला भेट दिली होती. भेटीच्या स्मरणार्थ ही देणगी देण्यांत आली आहे.

**बेळगांवचा पाणीपुरवठा**—म्हैसूर सरकारनें बेळगांवच्या पाणीपुरवठ्याची राकास्कोप योजना हातीं घेण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेसाठी ६३ लाख रुपये खर्च येणार असून तो सर्व राज्यसरकार करणार आहे. योजना पूर्ण झाल्यावर उपलब्ध होणारें पाणी सरकार म्युनिसिपालिटीला “ना फायदा ना तोटा” पद्धतीनें विकत देणार आहे.

**कलकत्त्याचें नवे रेडिओ स्टेशन**—कलकत्ता येथील केंद्रांत एका नव्या ध्वनिक्षेपकावरून कार्यक्रम प्रसारित करण्यास सुरवात झाली आहे. ध्वनिक्षेपकाची सर्व यंत्रसामुग्री अद्यावत् पद्धतीची असून ती सर्व कोलंबो मदत योजनेप्रमाणें भारताला मिळाली आहे. नव्या रेडिओ स्टेशनाची उभारणी हिंदी एंजि-निअर्सनीं केलेली आहे. अखिल भारतीय रेडिओच्या ५० लाख रुपयांच्या विस्तार योजनेचा हा एक भाग आहे.

**स्त्री-शिक्षकांची रहाण्याची सोय**—मुलींच्या शिक्षणाच्या सोयी वाढविण्यासाठी स्त्री-शिक्षकांची रहाण्याची सोय करण्या-साठी मध्यप्रदेश सरकारनें आपल्या,१९१ तहसिलांत रहाण्याच्या जागांची सोय करण्याचें ठरविलें आहे. रहातीं घरें बांधण्यासाठी १० लाख रुपये खर्च येणार आहे. त्यांपैकी ७५ टक्के खर्च मध्यवर्ती सरकार देणार आहे.

**लाकूडकामाचा सहकारी कारखाना**—मद्रास सरकारनें कन्याकुमारी जिल्ह्यांत लाकूडकामाचा एक सहकारी कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कारखान्यासाठी सरकारनें १·४१ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. संस्थेच्या सभासदांकडून १२,००० रुपये भाग-भांडवल जमविण्यांत येणार आहे. कारखान्यांत खिडक्या, दारें, फर्निचर, इत्यादि माल तयार होईल.

## १९५७ मधील भारतांतील वृत्तपत्रें

वृत्तपत्रांचा एकूण खप विचारांत घेतां निरनिराळ्या वर्गांतील वृत्तपत्रांच्या खपांत एकूण २·८ टक्के वाढ झाल्याचें दिसून येतें.

### मासिकांचा खप ४१% नीं घटला

अहवालाच्या वर्षांत एकंदर वृत्तपत्रें व नियतकालिकें यांच्यामध्यें पाक्षिकांचा खप सर्वांत जास्त म्हणजे ८४·६ टक्क्यांनीं वाढला, तर दैनिकांचा खप ८·३ टक्क्यांनीं आणि साप्ताहिकांचा खप १·१ टक्क्यानें वाढला आहे. मासिकांच्या खपाचें प्रमाण मात्र ४१ टक्क्यांनीं घटलें आहे.

इंग्रजी वृत्तपत्रांचा खप ०·९ टक्क्यानें वाढला, तर हिंदी वृत्तपत्रांचा खप ८·८ टक्क्यांनीं कमी झाला. इतर भाषांतील वृत्तपत्रांपैकीं आसामी ( १६·३ टक्के ). बंगाली, ( ४·४ टक्के ), कानडी ( ६३·२ टक्के ), उरिआ ( ७·० टक्के ) संस्कृत ( १५०·० टक्के ), तेलगू ( २८·९ टक्के ) व उर्दू ( ०·६ टक्के ) या भाषांतील वृत्तपत्रांचा खप वाढला, तर गुजराती ( १२·९ टक्के ), मल्याळी ( १७·७ टक्के ), मराठी ( १७·० टक्के ), पंजाबी ( १६·१ टक्के ) व तामीळ ( १०·२ टक्के ) या भाषांतील वृत्तपत्रांचा खप कमी झाला आहे.

### मासिकांचा व पाक्षिकांचा खप

१९५६ मध्यें २८४३ वृत्तपत्रांचा एकूण खप ११३ लाख प्रती होता, तर १९५६ मध्यें ३०५० वृत्तपत्रांचा एकूण खप ११० लाख प्रती होता. या खपाचें अधिक पृथक्करण करतां दैनिकांचा खप या वर्षांत ३१·४९ लाख अथवा एकूण वृत्तपत्रांच्या खपाच्या २७·९ टक्के होता. १९५६ चा हाच आंकडा २९·०८ लाख होता. मासिकांचा या वर्षांतील खप ३१·६२ लाख अथवा एकूण सर्व वृत्तपत्रांच्या खपाच्या २८·० टक्के होता. म्हणजे मासिकांचा खप १९५६ च्या ३४·७९ लाख या आंकड्याशीं तुलना करतां बराच कमी झाल्याचें दिसून येतें. साप्ताहिकांच्या बाबतींत पाहतां १९५७ मध्यें त्यांचा खप ३०·२७ लक्षांवरून किंचित् वाढून ३०·५२ लक्षांवर गेला. हा खप एकूण खपाच्या २७ टक्के आहे. पाक्षिकांच्या खपांतहि बरीच वाढ झाल्याचें दिसून येतें. १९५६ मध्यें ७·८५ लक्ष असलेला खप १९५७ मध्यें वाढून १४·४९ लक्षांवर गेला. मात्र 'इतर नियतकालिकें' या सदराखालीं मोडणाऱ्या वृत्तपत्रांचा खप १९५६ मध्यें ७·६० लक्ष होता, तो १९५७ मध्यें ३·१२ लक्षांनीं घटून ४·४८ लक्षांवर आला.

### इंग्रजी वृत्तपत्रें

इंग्रजी वृत्तपत्रांचा खप सर्वांत जास्त म्हणजे २४·९७ लक्ष किंवा वृत्तपत्रांच्या एकूण खपाच्या २२·३ टक्के होता. त्या खालोखाल खप हिंदी वृत्तपत्रांचा होता. हा आंकडा २०·२५ लक्ष किंवा १८ टक्के होता. गुजराती व मराठी वृत्तपत्रांचा खप एकूण खपाच्या अनुक्रमें ६·५ टक्के व ५·९ टक्के होता.

सर्व दैनिकांचा एकूण खप ३१·४९ लक्ष प्रती होता. त्यामध्यें इंग्रजी दैनिकांचा खप १०·०५ लक्ष म्हणजे १/३ हून किंचित् अधिक होता. मराठी व गुजराती दैनिकांचा खप अनुक्रमें २·४७ लक्ष व २·२६ लक्ष होता.

सन १९५७ मध्यें अस्तित्वांत असलेल्या एकूण पत्रांपैकी ४२·४ टक्के पत्रें व्यक्तिगत मालकीचीं होतीं, ही मालकीसंबंधांतील विशेष बाब होय. त्यानंतर धार्मिक अगर सहकारी सोसायट्या धरून सोसायट्यांच्या किंवा संस्थांच्या नियंत्रणाखालीं २१·१ टक्के वृत्तपत्रें होतीं. जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या मालकीच्या वृत्तपत्रांचें प्रमाण ९·५ टक्के, फर्म्सनीं आणि भागीदारींत चालविलेलीं वृत्तपत्रें ८·७ टक्के, शिक्षण संस्थांचीं ७·६ टक्के आणि सरकारी प्रकाशनें ५·५ टक्के होतीं.

मध्यवर्ती सरकार आणि राज्य सरकारें एकूण २९७ पत्रें प्रकाशित करतात. त्यापैकी १४९ पत्रें मध्यवर्ती सरकारकडून आणि १४८ राज्य सरकारांकडून प्रकाशित होतात.

परदेशांच्या भारतांतील वकिलाती, कमिशनें इत्यादींकडून ४४ प्रकाशनें प्रसिद्ध केलीं जातात. परदेशांच्या वकिलातीकडून प्रसिद्ध होणाऱ्या प्रकाशनासंबंधीचे आंकडे उपलब्ध असून त्यापैकीं 'अमेरिकन रिपोर्टर' पांच भाषांत छापलें जातें व त्याचा खप २,०७,०३५ आहे आणि 'सोव्हिएट लॅण्ड' १२ भाषांत छापण्यांत येतें व त्याचा खप १,६५,५७५ आहे, असें दिसून येतें.

### वृत्तपत्रांची एकूण संख्या

भारतांत ३१ डिसेंबर १९५७ रोजीं एकूण ५९३२ पत्रें होतीं. याच्या जोडीस ज्यांच्याविषयीं तपशील उपलब्ध होऊं शकला नाहीं किंवा ज्यांचें प्रकाशन बंद आहे वा कसें हें तपासून पाहतां आलें नाहीं अशीं आणखी ९७१ वृत्तपत्रें अस्तित्वांत असावींत. अहवालाच्या वर्षांत ८०० नवीं वृत्तपत्रें निघालीं, तर १७५ पत्रें बंद झालीं.

देशांत प्रसिद्ध होणाऱ्या सर्व वृत्तपत्रांत व नियतकालिकांत मासिकांची संख्या बरीच ( २३५१ ) आहे. त्यानंतर साप्ताहिकें ( १५८९ ), पाक्षिकें ( ५१७ ) व दैनिकें ( ४४६ ) याप्रमाणें क्रम लागतो. देशांत प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकांपैकीं एक चतुर्थांशाहून अधिक ( ११७ ) दैनिकें मुंबई राज्यांत प्रसिद्ध होतात.

---

**रशियन शिक्षकांचें आगमन**—राजकुमारी स्पोर्टस कोचिंग स्कीमप्रमाणें पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत दोन रशिअन खेळाडू शिक्षक म्हणून भारतांत येणार आहेत. एक खेळाडू कुस्ती शिकवील व दुसरा व्हॉलिबॉल शिकवील. दोन्ही खेळाडू भारतांत सहा महिने राहतील.

**नागपूरला एंजिनिअरिंग कॉलेज**— नागपूर येथें एक एंजिनिअरिंग कॉलेज स्थापन करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ह्याशिवाय राज्यांत तीन विविध व्यावसायिक शाळा काढण्याचेंहि ठरविण्यांत आलें आहे. ह्या सर्व शाळांत मिळून दरसाल ८०० विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय होऊं शकेल.

**गुरांचा व पिकांचा विमा**—आंध्र प्रदेशाचें सरकार गुरें व पिकें ह्यांच्या विम्याची एक योजना अंमलांत आणण्याचा विचार करीत आहे. ह्यासंबंधीं सरकारला सल्लामसलत देण्यासाठीं डॉ. पी. एस्. लोकनाथन् व डॉ. बी. नटराजन् ह्या अर्थशास्त्र्यांना पाचारण करण्यांत आलें आहे. अशा योजनेचा दुष्काळाच्या प्रसंगीं चांगला उपयोग होतो.

**ब्रिटनला जाणाऱ्यांना इशारा**—ब्रिटनमधील बिकट आर्थिक परिस्थितीमुळें तेथें काळ्या व गोऱ्या लोकांत कामधंदा मिळविण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. वेस्ट इंडिजमधून ब्रिटनमध्यें जाणाऱ्या निग्रोसाठी ब्रिटनमधील बेकारीची माहिती देणारीं पत्रकें तेथील सरकारनें काढलीं आहेत. ह्याच कारणामुळें ब्रिटनमध्यें वर्णद्वेषमूलक दंगे नुकतेच झाले.

# अर्थ

बुधवार, ता. २४ सप्टेंबर, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ब्रिटनमधील आशिआई विद्यार्थ्यांच्या मनोव्यथा

निरनिराळया विषयांतील पदवीनंतरचा उच्च अभ्यास करण्यासाठी अजूनहि बरेच आशिआई विद्यार्थी ब्रिटनमध्यें जातात. ह्या विद्यार्थ्यांत कमी-अधिक प्रमाणांत मनोव्यथेचें प्रमाण वाढतच चाललें असल्याचें दिसून येत आहे. विशेषत: भारत व पाकिस्तान ह्यामधून आलेल्या विद्यार्थ्यांना मनाच्या व्याधीनें ग्रस्त केल्याचें आढळून येत आहे. डॉ एम्. एन्. पै ह्या डॉक्टरांनीं ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्यें ह्या विषयासंबंधीं एक लेख प्रसिद्ध केला आहे. लेखांत ते म्हणतात कीं, विद्यार्थ्यांच्या मनोव्यथेचीं मुख्यत: दोन कारणें दिसून येतात. पहिलें कारण आर्थिक स्वरूपाचें आहे. ह्या विद्यार्थ्यांना घराकडून येणारे पैसे येण्यास विलंब लागला अगर ते आलेच नाहींत कीं एक प्रकारची विलक्षण मानसिक अस्वस्थता त्यांना घेरते. मग ह्या अस्वस्थतेचीं अनेक बाह्यचिन्हें दिसूं लागतात. पण पैसे मिळताच ही अस्वस्थता अगर तिचीं चिन्हें लवकर नाहींशीं होतात. दुसरें कारण मात्र जरा निराळया स्वरूपाचें आहे. कांहीं विद्यार्थी त्यांच्या आयुष्यांत प्रथमच एकटे राहिलेले असतात. त्यांचें पूर्वीचें आयुष्य घराच्या सुरक्षित वातावरणांत गेलेलें असतें. हे विद्यार्थी लंडनमधील अफाट वस्तींत एकटे राहूं लागल्यावर त्यांना पुष्कळदां एकाकीपणाची भावना ग्रासते व ते एकसारखें विषण्ण मन:स्थितींत वावरतात. त्यांना घराची जबर ओढ वाटूं लागते. कधीं कधीं भ्रमहि होतो. अशा वेळीं त्यांचीच भाषा बोलणाऱ्या एखाद्या विद्यार्थ्याची गांठ घालून दिली तर विषण्णता नाहींशीं होण्याचा बराच संभव असतो. कांहीं विद्यार्थ्यांना त्यांनीं घेतलेले अभ्यासक्रम झेपत नाहींत किंवा ब्रिटिश विद्यापीठाच्या अभ्यासाविषयींच्या अपेक्षा पुऱ्या करतां येत नाहींत. मग ते नृत्याला जाणें अगर स्वस्त दराच्या हॉटेलांत जाणें, असे कार्यक्रम सुरू करतात.

---

## बिहारमधील तेलशुद्धीचा कारखाना

हिंदमध्यें खनिज तेलाची उपलब्धि कमी असल्यानें तेलाची बरीच आयात परदेशाकडून करावी लागते. ज्वालामुखी येथें व गुजरातमध्यें खंबायतच्या भागांत तेलाचे सांठे शोधण्याचे प्रयत्न चालू असून त्यांना यश येण्याचा संभव दिसत आहे. नव्या खाणींच्या शोधाबरोबर तेलशुद्धीचे कारखानेहि काढण्यांत येत आहेत. बिहारमध्यें बरौनी येथें असा एक कारखाना उभारण्यांत येणार आहे. भारत सरकारनें रशिअन सरकारला अशी विनंति केली आहे कीं, त्यांनीं आपल्या तेलतज्ज्ञांकरवीं ह्या कारखान्यासंबंधीं आपला तपशीलवार अहवाल भारत सरकारला पाठवावा. हा अहवाल तीन महिन्यांत येईल असा अंदाज आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागांत काढण्यांत येणाऱ्या ह्या कारखान्यांत २० लाख टन तेल शुद्ध करण्यांत येईल. कारखान्यासंबंधींच्या तांत्रिक व आर्थिक बाबींचा विचार करून १९५८ च्या डिसेंबरपर्यंत अखेरचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ३९ कोटी रुपये भांडवल लागेल आणि त्यांत तेलजन्य नेहमींच्या इतर वस्तूंशिवाय विमानांना लागणारें जळाऊ तेल आणि वंगणाचें तेलहि निर्माण करण्यांत येईल. रुमेनिआच्या तांत्रिक व आर्थिक मदतीनें आसाममध्यें उभारण्यांत येत असलेल्या कारखान्यांत प्रत्यक्ष उत्पादनास १९५९ च्या प्रारंभीं सुरवात होईल. ह्या कारखान्यांत केरोसीन व डिझेल ऑइल तयार करण्यांत येईल. भारतामधील पेट्रोलजन्य पदार्थांचा खप सारखा वाढत आहे. १९५६ सालीं ४०,८०,००० लाख टन तेलाचा खप झाला, तर १९५८ सालीं तो सुमारें ५५ लाख टनावर गेला आहे. सध्यां भारतांत तेलशुद्धीचे चार कारखाने आहेत. त्यांपैकीं दोन मुंबईंत, एक विशाखापट्टम् येथें व चौथा दिग्बाई येथें आहे.

---

## बँक-ठेवींवरील व्याजाचे दर निश्चित झाले

### ३७ प्रमुख बँकांचा करार

सदतीस प्रमुख हिंदी व एक्सचेंज बँकांनीं मिळून स्वखुषीनें आपआपसांत करार करून १ ऑक्टोबर नंतरचे व्याजाचे कमाल दर नियंत्रित केले आहेत. हा करार प्रारंभीं सहा महिने अंमलांत राहील. करारांतील प्रमुख अटी खालीलप्रमाणें आहेत :—

तीन महिन्यांपेक्षां कमी मुदतीच्या ठेवींवर आणि सात किंवा अधिक दिवसांच्या नोटिशीनें परत करावयाच्या ठेवींवर ३-७/८% हा कमाल व्याजाचा दर राहील. तीन महिन्यांपेक्षां ज्यास्त मुदतीच्या ठेवींवरील कमाल दर ४% पेक्षां ज्यास्त असणार नाहीं सात दिवसांपेक्षा कमी मुदतीच्या ठेवी घेतल्या जाणार नाहींत. सात दिवसांच्या नोटिशीच्या ठेवींची किमान रक्कम २५,००० रु. हवी. सात दिवसांपेक्षा ज्यास्त पण एक महिन्यापर्यंतची ठेव किमान १०,००० रु. ची हवी. एक महिन्यापेक्षा ज्यास्त मुदतीची ठेव १०,००० रु. पेक्षा कमी असायला हरकत नाहीं कॉल डिपॉझिटसना किंवा सात दिवसांपेक्षा कमी नोटिशीच्या ठेवींना व्याज दिलें जाणार नाहीं. दोन वर्षांपेक्षा ज्यास्त मुदतीच्या ठेवी कॅश सर्टिफिकिटांच्या स्वरूपाच्याच असायला हव्यात. सेव्हिंग्ज बँक खात्यांतील ठेवींवर कमाल २½% व्याज देतां येईल.

वरील करार मोडल्यासंबंधीं येणाऱ्या तक्रारींचा विचार करण्यासाठी "ऑल-इंडिया इंटर-बँक ॲग्रीमेंट एक्झिक्यूटिव्ह" कमिटी नेमण्यांत आली आहे. इंडियन बँक्स असोसिएशनचा चेअरमन हा त्या कमिटीचा चेअरमन असून, एक्सचेंज बँकांचे दोन व इं. बँक्स असोसिएशनचे दोन, असे तिचे सभासद आहेत.

---

**पंजाब सरकारच्या नोकऱ्या**—पंजाब सरकारनें आपल्या राज्याच्या सिव्हिल सर्व्हिसच्या जागांसाठी घेण्यांत येणाऱ्या परीक्षांसाठी भारतामधील कोणत्याहि राज्यांतील उमेदवारांना बसण्याची परवानगी दिली आहे. आतांपर्यंत ह्या परीक्षांना फक्त दिल्ली व पंजाब राज्यांतील नागरिकांनाच बसतां येत असे.

## अमेरिकेंतील परकीय व त्यांतील भारतीय विद्यार्थी

"इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल एज्युकेशन" या संस्थेनें शैक्षणिक देवघेवींविषयीं "ओपन डोअर्स १९५८" या नांवाचा एक अहवाल तयार केला आहे. कॅनडा व चीन येथून अमेरिकेस शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी वगळले तर, अमेरिकेंतील परदेशी विद्यार्थ्यांत जास्तींत जास्त संख्या भारतीय विद्यार्थ्यांचीच आहे, असें त्या अहवालांत म्हटलें आहे.

अमेरिकेंतील कॉलेजांत व विद्यापीठांत २,५०० भारतीय विद्यार्थी अभ्यास करीत आहेत. त्या संख्येपेक्षा अधिक संख्या केवळ कॅनेडियन व चिनी विद्यार्थ्यांचीच आहे. ६,००० कॅनेडियन विद्यार्थी व ३,००० पेक्षा थोडे अधिक चिनी विद्यार्थी अमेरिकेंत शिकत आहेत.

इतर कोणत्याहि देशापेक्षा अमेरिकेविषयीं परकीय विद्यार्थ्यांना अधिक आकर्षण वाटतें. १९५७-५८ सालीं अमेरिकेंतील परदेशी विद्यार्थ्यांची संख्या अमेरिकेच्या इतिहासांत अपूर्व ठरण्याइतकी वाढली होती. त्या वर्षी १४५ देशांतून आलेले ४३,३९१ विद्यार्थी व अभ्यासक अमेरिकेंतील १,८०० शिक्षण-संस्थांत अभ्यास करीत होते.

या वर्षी "इन्स्टिट्यूट"नें पांच वेळां केलेल्या पाहणीवरून वरील आंकडे जमविलेले आहेत. या पाहणीवरून असें आढळून आलें आहे कीं, अमेरिकेंत शिकणारा वैशिष्ट्यपूर्ण विद्यार्थी साधारणतः आशियांतील असतो. इतर कोणत्याहि विषयांपेक्षा इंजिनियरिंगकडेच त्याचा अधिक ओढा असतो. विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचें प्रमाण ३·१ असें असतें. फक्त फिलिपाइनमधूनच विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थिनी अधिक असतात. आशियाई विद्यार्थी साधारणतः स्वतःच्या खर्चानें अमेरिकेंत आलेला असतो. शिष्यवृत्ति मिळाली तरच तो येतो असें नाहीं.

अमेरिकन सरकार आणि खासगी अमेरिकन विश्वस्तनिधि (फौंडेशन) व विद्यापीठें यांच्याकडून मिळणाऱ्या देणग्यांमुळें परकीय विद्यार्थी अमेरिकेकडे आकर्षिले जातात हें खरें आहे; पण स्वावलंबनानें अमेरिकेस येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या इतकी मोठी आहे कीं, अमेरिकेंतील शाळांच्या श्रेष्ठ लायकीमुळेंहि विद्यार्थी आकर्षिले जातात असा निष्कर्ष काढतां येतो, असें अहवालांत म्हटलें आहे.

अमेरिकेच्या प्रत्येक राज्यांत, कोलंबिया जिल्ह्यांत (राजधानींत) आणि अलास्का, हवाई व पोर्टोरिको या प्रदेशांत या वर्षी परकीय विद्यार्थी होते. सगळ्यांत अधिक परकीय विद्यार्थी कॅलिफोर्नियांत होते आणि त्याखालोखाल न्यूयॉर्कमध्यें होते. अमेरिकेंतील परदेशी विद्यार्थ्यांची एक-चतुर्थांशापेक्षा, अधिक संख्या या दोन राज्यांतच होती. मिशिगन, मॅसॅचूसेट्स व इलिनॉय या राज्यांत प्रत्यकी २,५०० पेक्षा अधिक विद्यार्थी होते.

---

**तेल सांपडलें, पण**—खंबायत जवळ लुनेज या खेड्यांत खनिज तेल सांपडल्यामुळें भारतांत सर्व ठिकाणीं आनंद झाला असला तरी त्या खेड्यांतील शेतकरी मात्र चिंतेंत आहेत. त्यांना अशी भीति वाटत आहे कीं, तेलाचा आणखी शोध करण्यासाठी गांवांतील सर्वच जमीन सरकार आपल्या ताब्यांत घेईल. ताब्यांत घेण्यांत आलेल्या जमिनीबद्दलच्या नुकसानभरपाईबद्दलहि चिंता व्यक्त करण्यांत येत आहे.


स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
(१९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली)

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९५,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री रा. सा. भ. ना. ढोबळे, (अध्यक्ष)
श्री. गे. गो. ढोले, (उपाध्यक्ष)
श्री. उ. भा. तांबे, (ऑ. मॅ. डायरेक्टर)
श्री. म. बा. वेंडे, (ऑ. खजिनदार)
श्री. म. मा. वामन डायरेक्टर
श्री. गे. ल. पाटील नलवडे ,,
श्री. आ. पां. ढोर ,,
श्री. ज्ञा. मा. मनसुख ,,
श्री. म. रा. नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.



सुरक्षित गुंतवणूक तथापि भरपूर मोबदला

# दि बेळगांव बँक लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)
मुख्य कचेरी : रविवार पेठ, बेळगांव

मुंबई व म्हैसूर राज्यांत एकूण २१ शाखा

आमच्या ठेवीदारांसहि योग्य मोबदला मिळावा म्हणून आम्ही ठेवींवरील व्याजाचे दर खालीलप्रमाणें वाढविले आहेत.

★ द. द. शें. ४ टक्के व्याजाच्या त्रैवार्षिक कॅशसर्टिफिकेटसची नवीन योजना—

★ मुदत ठेवी—

| | | | |
|---|---|---|---|
| ६ महिने | द. द. शें. | ३ | टक्के |
| १ वर्ष | ,, | ३। | ,, |
| २ वर्षे | ,, | ३॥ | ,, |
| ३ वर्षे | ,, | ३॥। | ,, |
| ४ वर्षे | ,, | ४ | ,, |

★ सेव्हिंग्ज खातें द. द. शें. २ टक्के
होम सेव्हिंग्ज खातें ,, २॥ ,,

★ आकर्षक मोबदल्याची मासिक समान हप्त्यांची क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खातीं १, २, ३ व ४ वर्षांचे मुदतीनें स्वीकारलीं जातात.

—बँकेचें स्थैर्य व प्रगति दर्शविणारे आंकडे—

वसूल भांडवल रु. सहा लाख
रिझर्व्ह व इतर फंड्स ,, सवातीन लाख
एकूण ठेवी ,, एक कोटी, सदतीस लाख

विशेष माहितीसाठी आमच्या कोणत्याहि शाखेंत चौकशी करा.

गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.
एच्. एस्. कुलकर्णी, बी. ए., जनरल मॅनेजर.




दसऱ्याला पाहूं..

आतां दिवाळींत..

एक तारखेला नक्की...

दरवेळीं कांहीं ना कांहीं
तरी सबब सांगून विमा
विक्रेत्याला परत लावतां,
परंतु त्यामुळें तुम्ही तुमच्या
कुटुंबाचे भवितव्य किती
धोक्यांत आणतां याची
कल्पनाहि तुमच्या मनांत
नसते. तुम्ही नसलांत तर
तुमच्या कुटुंबाला कोणत्या
प्रसंगाला तोंड द्यावें लागेल
याचा विचार करा, म्हणजे
मग विमा एजंटाला तुम्ही
असें परत पाठविणार नाहीं



लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

सेंट्रल ऑफिस : "जीवन केंद्र" जमशेटजी टाटा रोड, मुंबई-१

PRATIBHA/LIC/ 3.



५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा
करीत असलेलें मुंबईतील एक
प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी
खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



सस्तु साहित्यवर्धक कार्यालयाचें
આગામી પ્રકાશન
મધુમાલતીનું સૌંદર્ય
मूळ लेखक :
श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
गुजराती अनुवादक:
भा. शशिन् ओझा, एम्. ए.
प्रस्तावना :
लेडी प्रेमलीलाबेन ठाकरसी
उप-कुलगुरु, श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ.

## दि बॉबे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक लि.

वर्षाअखेरचा निव्वळ नफा रु. ८,१९,९७७ झाला आहे. ३०–६–५८ अखेर भरपाई झालेल्या भांडवलावर द. सा. द. शे. ५% डिव्हिडंड देण्यासाठी रु. ४,७३,००० चा विनियोग केला जाईल.

### खेळत्या भांडवलांत ६·८३ कोटी रु. ची वाढ

वर्षअखेर ठेवींत रु. १·२३ कोटींनीं वाढ झाली व एकूण ठेवी रु. ११·९४ कोटी झाल्या. खेळतें भांडवल रु. २४·४७ कोटी झाले. मागील वर्षापेक्षा हें रु. ६·८३ कोटींनें जास्त आहे. जुन्या मुंबई राज्याच्या विभागांत ही बँक ॲपेक्स बँक म्हणून काम करीत आहे. या विभागांतील सहकारी क्षेत्रांत झालेल्या वाढीचें हें द्योतक आहे.

प्रत्येक जिल्ह्यांत एक जिल्हानिहाय मध्यवर्ती बँक असावी अशा धोरणास अनुसरून चार मध्यवर्ती बँका स्थापल्या गेल्या. त्यामुळें पश्चिम खानदेशमधील १० शाखा, अहमदनगर जिल्ह्यांतील ७ शाखा व नाशिक जिल्ह्यांतील १ शाखा बंद करण्यांत येऊन, सदर शाखांचें कार्यक्षेत्र जिल्हा बँकांकडे सुपूर्त करण्यांत आलें. कुलाबा व बनासकांठा जिल्ह्यांत शेतकऱ्यांच्या सोयीसाठी ४ शाखा व बृहन्मुंबई शहरांत २ शाखा नवीन काढण्यांत आल्या. वर्षअखेर एकूण शाखांची संख्या ४४ होती. मागील वर्षअखेर ही संख्या ५६ होती.

### सहकारी कारखान्यांना कर्ज-पुरवठा

सहकारी क्षेत्रांत झालेल्या वाढीमुळें बँकेनें दिलेल्या कर्जांतहि कांहीं प्रमाणांत वाढ झाली व रद्द सोसायट्यांकडील येणें वजा जातां वर्षअखेर एकूण कर्ज रु. १४·७० कोटी इतकें राहिलें. गतवर्षी एकूण कर्ज रु. १०·०४ कोटी होतें. ठरलेल्या धोरणाला अनुसरून व्यक्तिगत कर्जांत आणखी घट झाली. शेती हंगाम विशेष समाधानकारक नव्हता, तरी जपानी पद्धतीच्या भात शेतीचा प्रयोग बऱ्याच प्रमाणांत यशस्वी झाला. शेती मालाचे भाव हंगामांत नरम असूनसुद्धां कर्जवसुलींत प्रगतीच दिसून आली. तसेंच जिल्हा मध्यवर्ती बँकांकडे व्यवहार वर्ग झाल्यानें शेतीविषयक कर्जांत रु. ९१·०३ लाख घट झाली व सदरहू एकूण कर्जे रु. २४७.६३ लाख राहिली. सोसायट्यांना दिलेल्या शेतीव्यतिरिक्त कर्जांत रु. २७४·४९ लाख वाढ होऊन सदर कर्जे एकूण रु. ६९६·९३ लाख राहिली. पैकी सहकारी साखर कारखान्यांना दिलेलीं कर्जे रु. ४४४·७१ लाख आहेत. वर्षअखेरीच्या महिन्यांत एका साखर कारखान्याचा कर्जव्यवहार जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे वर्ग करण्यांत आला. सहा कारखान्यांना दैनंदिन भांडवलाकरितां रु. ३४० लाख व इतर सहा कारखान्यांना, इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनकडून कर्ज मिळेपर्यंत तात्पुरती कर्जे रु. ३७० लाख देण्यांत आलीं. कारखान्यांना रु. ५१·९४ लाखांचीं मध्यम मुदतीचीं कर्जे कारखाने उभारण्याचें काम पुरें होण्याकरितां सरकारी हमीवर मंजूर करण्यांत आलीं. शिवाय तीन कारखाने चालू हंगामांत सुरू न होऊं शकल्यानें मशिनरीचे ठरलेले हप्ते भरण्यासाठी त्यांना रु. १९·७० लाखांचीं स्पेशल कर्जे मंजूर करण्यांत आलीं. औद्योगिक सहकारी संस्थांना दिलेल्या कर्जांतहि वाढ झाली.

सहकारी संस्थांच्या वाढत्या कर्जमागणीमुळें व त्या प्रमाणांत बँकेच्या ठेवींत वाढ न होऊं शकल्यामुळें, रिझर्व्ह बँकेकडून घेतलेल्या कर्जांतहि वाढ झाली. रिझर्व बँकेकडून घेतलेलीं कर्जे जास्तींत जास्त रु. २·३५ कोटी होती. पैकी वर्षअखेर रु. १·४० कोटी बाकी राहिली. शिवाय, मध्यवर्ती बँकांकरितां रिझर्व्ह बँकेकडून काढलेल्या कर्जांतहि मागील सालशीं तुलना करता रु. ४·०५ कोटीपासून रु. ५·७९ कोटीपर्यंत वाढ झाली. वर्षअखेर हीं कर्जे रु. ५·२५ कोटी होतीं. हींच कर्जे गतसालअखेर रु. २·४१ कोटी होती.

### राज्यसरकारची शेअर्समध्यें गुंतवणूक

सालमजकुरी ग्रामीण सहकारी संस्थांच्या तसेंच ॲपेक्स व मध्यवर्ती सहकारी बँकांच्या भांडवलांत राज्य सरकारनें भाग घेण्याबाबतच्या अटी व नियम नक्की करण्यांत आले. मुंबई राज्य सरकारनें ह्या बँकेच्या भाग भांडवलांत जादा रु. ५० लाख गुंतवून सरकारी भाग भांडवल रु. ८१ लाख पर्यंत वाढलें. सरकारनें मध्यवर्ती सहकारी बँकांच्या भाग भांडवलांत रु. ३४·७५ लाखांची भर घातल्यामुळें सदर भांडवल रु. ७१·२५ लाख झालें. तसेंच सरकारनें ॲपेक्स व मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत ग्रामीण सहकारी संस्थांच्या भाग भांडवलांत रु. ४१·८६ लाख गुंतविलें. ता. १–७–१९५७ पासून सोसायट्यांकरितां मंजूर करावयाचे भाग दर्शनी किंमतीस द्यावयाचे बोर्डानें ठरविलें व त्यानुसार मराठवाड्यांतील मध्यवर्ती बँकांकडून घेतलेल्या शेअर्सवरील प्रिमियमच्या ऐवजीं त्यांस बँकेचे शेअर्स मंजूर केले. चालू वर्षअखेर बँकेचें एकूण भाग भांडवल, सरकारी भाग भांडवल रु. ८१ लाख धरून, रु. १२५·८५ लाख झालें. गेल्या सालीं हें रु. ७१·११ लाख होतें.

प्रो. डी. जी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखालीं १९५६ सालीं संचालक मंडळानें नेमलेल्या "कॉप लोन इव्हॅल्युएशन कमिटी" नें बहुमोल अहवाल सालमजकुरी सादर केला. सदर अहवालाबद्दल संचालक मंडळ प्रो. डी. जी. कर्वे व त्यांचे सहकारी यांचे ऋणी आहे कमिटीनें केलेल्या शिफारसीबाबत संचालक मंडळाकडून विचार चालू आहे. पुनर्घटित मुंबई राज्याकरितां एकच सहकारी कायदा असावा व तसेंच राज्यांतील ॲपेक्स बँकांचें कार्यहि एकत्रित आणावें या प्रश्नांचाहि विचार सरकार करीत आहे.

---

**१,५०० मण गहूं वाया गेला**—मुझफ्फरपूर येथील अधिकाऱ्यांनीं १,५०० मण गहूं खाण्यास अयोग्य ठरविला आहे. हा गहूं स्वस्त धान्याच्या दुकानांतून विकण्यांत येणार होता. त्याची किंमत सुमारें २२,००० रुपये होती. गहूं उघड्या रेल्वे वाघिणींतून आणण्यांत येत असतांना पाऊस पडून भिजला व निकामी झाला असें समजतें.

दातांच्या स्वच्छतेसाठीं
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## सौकर्यानें भाडें वसुलीचें नवीन विधेयक

### "डिस्ट्रेस" म्हणजे काय ?

(लेखक : नारायण विनायक मोंडे, बी. ए., एलएल. बी. पुणें २)

" Speedy and Cheap justice was what was wanted in India. The Small Cause Courts are Courts which I believe are very much appreciated in the country and their working as I believe, been highly conducive to the good of the people, who have thereby been able to obtain speedy and substantial justice."

Hon'ble Mr. Scobel, Gazette of India 1887 Part XI P25-27.

"If there is any value in the work of the Small Cause Court, It is that Speedy Justice is done and the parties get an early decision on the matter in dispute between them, so that a petty litigation is not prolonged and carried to undue extent."

Justice Sir George Knox, 1917 Abdual V Bedhadhar 39 All, 101.

मुंबई, मद्रास व कलकत्ता या शहरांतील घरमालकांना आपले भाडेकऱ्यांकडून भाड्याची थकबाकी झटपट पण कायदेशीर रीतीनें वसूल करता येते. इतकेंच नव्हे तर केवळ अर्ज करून भाडेकरू अगर परवानगीनें राहूं दिलेले इसम यांजकडून जागेचा कबजाहि मागतां येतो व हा अधिकार ते गेलीं पाऊणशें वर्षे उपभोगीत आहेत. कोणाहि घरमालकाला भाडेकऱ्याकडून थकबाकी त्वरित रीतीनें वसूल करणें असल्यास त्यांनीं स्मॉल कॉज जज्जाकडे तसा अर्ज सोबत जागेचा व भाड्याचा तपशील देऊन शपथपत्रक अथवा ॲफिडेव्हिट दिलें म्हणजे सदर कोर्ट सहा दिवसांत परत येईल असें वॉरंट नियुक्त बेलिफास देते. नवीन विस्तृत पुनर्घटित मुंबई राज्यांत ज्या ज्या शहरांत स्मॉल कॉज कोर्ट आहे त्या त्या शहरांतील घरमालकांना ही सवलत मिळावी म्हणून प्रॉव्हिन्सिअल स्मॉल कॉज कोर्टस ॲक्टांत दुरुस्त करणारे विधेयक ( नं. ६४ सन १९५८ चे ) मुख्य मंत्री श्री. वाय. बी. चव्हाण यांनीं आणलें असून तें २१ ऑगस्टचे गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे. हल्लीं अहमदाबाद, पुणें, हैद्राबाद, नागपूर वगैरे ठिकाणीं स्वतंत्र स्मॉल कॉज कोर्टे असून तेथील घरमालक व भाडेकरू यांना हा कायदा लागूं होईल. स्मॉल कॉज कोर्टाचे अधिकार दिलेल्या न्यायाधिशाला हे अधिकार वापरतां येणार नाहींत. तीन महिन्यांपेक्षा कमी मुदतीची थकबाकी अगर अर्जापूर्वी बारा महिन्यांपेक्षा मागील मुदतीचें भाडें, अगर सरकारला मिळणारें भाडें या झटपट वसुली मार्गाचे कक्षेंत येणार नाहीं व यासाठीं प्रॉव्हिन्शिल स्मॉल कोर्टे कायद्यांत स्वतंत्र विभाग नं. ४ ( अ ) घालण्यांत येणार आहे.

#### डिस्ट्रेस

बेलिफाला हुकूम मिळाला म्हणजे, खर्चासुद्धां रक्कम वसूल होईल एवढा जंगम माल, जो भाड्यानें दिलेल्या जागेवर अगर जागेंत सांपडेल तो, बेलिफानें ताब्यांत घ्यावा; त्याची यादी व किंमती कराव्यात; त्याची समज ऋणकोस द्यावी; त्याप्रमाणें कोर्टास अहवाल सादर करावा ( कलम २७ आय ). माल धरल्यापासून १५ दिवसांत ऋणकोनें स्मॉल कॉज जज्जाला अर्ज केल्यास व त्यास योग्य वाटल्यास वाजवी अटीवर वॉरंट तहकूब अगर रद्द करण्याचा कोर्टास अधिकार आहे. (२७ जे). तिऱ्हाईत इसमाचा माल जप्त केल्यास त्यासहि कोर्टाकडे दाद मागतां येईल. कोर्टाचे द्रव्यविषयक हुकमतीपेक्षा दाव्यांतील विषय जास्त किंमतीचा असेल तर डिस्ट्रिक्ट कोर्ट स्वतः ह्या प्रकरणाचा निकाल करील. जंगम मालाचा ताबा मिळाल्यापासून १५ दिवसांत अगर वाढविलेल्या मुदतींत ऋणकोकडून पैसे आले नाहींत अगर विरुद्ध हुकूम झाला नाहीं तर नाझरनें अशा मालाची अंदाजी किंमत नोंदवून व ऋणकोस समज देऊन मुदत टळल्यानंतर तो खुशाल विकावा. विक्रीचे उत्पन्नांतून प्रथम बजावणीचा खर्च काढून घेऊन बाकी रकमेंतून घरमालकाची रक्कम देऊन, कांहीं शिल्लक उरली तर ती ऋणकोस परत करावी अशी तरतूद विधेयकांत आहे. ( २७ ओ ), प्रत्यक्ष उपयोगांत असलेल्या जिनसा, ऋणको व त्यांची पत्नी व मुलें यांचे वापरण्याचे कपडे, स्वयंपाकाचीं भांडीं, पथारी व धार्मिक रिवाजाप्रमाणें आवश्यक असलेलें मंगळसूत्रासारखें डाग, तसेंच कारागिरीचीं हत्यारें, शेतकऱ्याचीं उपकरणें व पुढील हंगामापर्यंत लागणारें धान्य व गुरें, हिशेबाचीं पुस्तकें, वगैरे माल जप्तीस पात्र नाहीं व त्याचा ताबा बेलीफानें घेऊं नये असा आदेश कलम २७ एफ व जी नें स्वच्छ दिला आहे.

#### प्रतियोगी सहकारिता, मान्य आहे

नवीन विधेयकांतील तत्त्व सामान्यतः मान्य करण्यासारखें आहे. पक्षकारास विनाविलंब दाद मिळणें हें न्यायाचें सूत्र आहे. शक्यतों भाडेकऱ्याकडेच जागा ठेवण्याची तरतूद भाडेनियंत्रण कायद्यानें केली असल्यामुळें प्रतियोगी सहकारिता म्हणून भाडेकऱ्यांनीं थकबाकीदार न होण्याची दक्षता घेतली पाहिजे. १८८२ च्या प्रेसिडेन्सी स्मॉल कॉज कोर्ट ॲक्टचे भाग ७ अन्वयें मुंबई, मद्रास, कलकत्ता येथील घरमालकांस विशिष्ट परिस्थितींत भाडेकऱ्यांकडून व परवानगीनें रहाणाऱ्या इसमाकडून स्टॅम्प देऊन फिर्याद न लावतां केवळ अर्ज करून जागेचा कबजासुद्धां मागतां येतो व त्या जज्जाचे निकालावर अपील नाहीं. अव्वल दावा चालेल. ( न्या. छगला, बालमुकुंद वि. मंगळदास ५५ बॉम्बे लॉ रिपोर्टर पान ५० पहा ) तेव्हां थकबाकी वसुलीची तरतूद गैरवाजवी नाहीं. तथापि ह्या विधेयकांत कित्येक फरक होणें आवश्यक आहे. तसें केलें नाहींत तर

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८] सारस्वत बँक गृह, मुंबई ४ [ टेलिफोन २७०९४

३, ५ व १० वर्षें मुदतीचीं
सिल्व्हर ज्युबिली सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें } व्याज ३॥ ते ४॥ टक्के

: बँकेच्या शाखा :

फोर्ट, दादर, वरळी, माहिम, पुणें, बेळगांव ★ महिला शाखा : सारस्वत बँक गृह, मुंबई ४.

हद्दींचे घर टंचाईचे दिवसांत या विधेयकानें उपायापेक्षा अपाय होण्याची भीति आहे. फरक सुचवितों ते येणेप्रमाणें—

विधेयकांत खालील फरक हवेत

(१) भाडें म्हणजे स्टँडर्ड रेंट का अर्जापूर्वी भाडेकरी देत असेल ती मासिक रक्कम याचा खुलासा करावा. भाडें नियंत्रण कायद्याची दखल या विधेयककर्त्यांनीं मुळींच घेतली नाहीं. सहा महिने अगर त्यापेक्षा जास्त मुदतीचें भाडें थकल्याखेरीज या द्रुतवसुलीचे कायद्याचा वापर करतां येऊं नये.

(२) केवळ शपथ पत्रिकेचे आधारावर एकतर्फी वॉरंट देणेपूर्वी भाडेकऱ्यास आगाऊ नोटीस देऊन त्यास आपलें म्हणणें मांडण्यास संधि द्यावी, म्हणजे मागाहून येणारा तक्रार अर्ज कदाचित वांचेल.

(३) वॉरंटाची अंमलबजावणी करणेपूर्वी एक नोटीस बेलिफानें ऋणको भाडेकऱ्यावर बजवावी, अगर भाड्याचे जागेवर चिकटवावी.

(४) मंगळसूत्राप्रमाणें देवाच्या मूर्ति व इतर धार्मिक व पवित्र वस्तू जप्तीस व लिलावास पात्र नसाव्यात.

(५) बेलिफानें ताब्यांत घेतलेल्या मालाच्या यादीवर निदान एका साक्षीदाराची तरी स्वाक्षरी असावी व मालाची अंदाजी किंमत लावतांना जवळचे इसमाचे म्हणणें बेलिफानें लक्षांत घ्यावें.

(६) भाड्याचे जागेवर व जागेंत असलेलाच फक्त जंगम माल बेलिफानें कबजांत घेणेचा आहे व इतर ठिकाणचा घेण्यास त्यास मनाई आहे (क. २७ एच). सबब अर्जांत व वॉरंटांत स्थावर मिळकतीचें वर्णन भरपूर व चतुःसीमापूर्वक असावें. तिसरे परिशिष्टांतील नमुना नंबर अ मध्यें ही तरतूद मुळींच नाहीं. त्यांतील तपशील अपुरा आहे.

(७) कोर्टाचे द्रव्यविषयक हुकमर्तापेक्षा जास्त रक्कम थकबाकीची असेल तर अर्जदारानें अथवा हकदारानें डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे अर्ज करावा अशी तरतूद २७ एम कलमांत आहे, ती अनावश्यक आहे. भाडेनियंत्रण कायद्यानें कितीहि भाड्याचे रकमेचा व विस्तृत व मूल्यवान जागेचा कबजाचा निवाडा करण्याचा अधिकार स्मॉल कॉज जज्जास आहेच. शिवाय तीन ते बारा महिन्यांपर्यंतचेच थकबाकीबद्दल मालकांस या नवीन कायद्यानें दाद मागतां येणार आहे. सबब डिस्ट्रिक्ट जज्जाकडे जाण्याची आवश्यकता व खटाटोप बंद करावा. शिवाय हे अर्ज वर्ग करण्यास डिस्ट्रिक्ट कोर्टास मुभा ठेवली नाहीं, त्यांनींच ते चालविले पाहिजे असा दंडक विधेयकांत आहे. त्यायोगें अधिक महत्वाचें काम करण्याचा जिल्हा न्यायाधिशाचा वेळ मात्र जाणार. तो टाळणें अवश्य आहे. १८८२ चे प्रेसिडेन्सी स्मॉल कॉज कोर्ट ॲक्टाचें कलम या विधेयकानें जशाच्या तसें उचललें आहे. परंतु त्यानंतर राज्यांत प्रसृत झालेले कायदे लक्षांत घेतले पाहिजेत.

(८) २७ क्यू अन्वयें ह्या जप्तीचे खर्चांत बेलिफाचा मुशाहिरा समाविष्ट करावा असें आहे. परंतु बेलिफ हा सरकारी नोकर आहे. ज्याप्रमाणें प्रोसेस भरावी लागते त्याप्रमाणें मालवहातूक, वाहन, याचे खर्चाची कॉटिंजंट चार्जेस म्हणून वसुलीची स्वच्छ तरतुद सदर खर्चांत आहे. सबब बेलिफाचा मुशाहिरा हा शब्दप्रयोग सदर कलमांतून वगळावा. ही रक्कम किती व कशी फुगेल याचा नेम नाहीं, अंत नाहीं. मात्र राजरोस रेम्युनरेशन हा शब्द कायद्यांत ठेवला तर लांचलुचपतीच्या संभाव्य आरोपापासून संबंधी कामगार सदैव मुक्त राहील. अशी पळवाट कायद्यानें ठेवावी काय?


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वायू. एस्. जोशी
मॅनेजर.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) — श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. ७०,००,०००चे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.